**जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचे कार्यालय**
क्र.कार्या-5/मगांराग्रारोहयो/सलेअ/35/18
दिनांक :-07 जानेवारी, 2018

विषय :- **महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना- 2005**
मगांराग्रारोहयो अंतर्गत नियोजन पुस्तिका व जॉब कार्ड छपाई करून पुरविण्याकरिता दरपत्रक मागविण्यासाठी सुचना.

संदर्भ :- मा. आयुक्त मग्रारोहयो-महाराष्ट्र, नागपूर यांनी दिनांक 02.02.2018 च्या V.C. मध्ये दिलेले निर्देश.

उपरोक्त संदर्भिय विषयाचे अनुषंगाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत वित्तीय वर्ष 2018-2019 करिता जिल्हापरिषदेच्या सर्व साधारणसभेमध्ये मंजुर करण्यात आलेल्या तालुकानिहाय नियोजनाच्या पुस्तिका कार्यरत यंत्रणाना तसेच तहसिल कार्यालय व पंचायत समितीला पुरवठा करावयाचा आहे. त्याप्रमाणे जॉबकार्ड पडताळणी व अद्यावतिकरण अंतर्गत SECC Data मधील भुमीहीन कुटूंबाचे सर्वेक्षण व ईच्छूक MCL कुटूंबांना लवकारात लवकर जॉबकार्ड द्यावयाचे आहे. सदर नियोजन पुस्तिका व जॉब कार्ड छपाई करून पुरविण्याकरिता अधिकृत मुद्रणालयधारकाकडुन मोहोरबंद दरपत्रक मागविण्यात येत आहे. याबाबतचा निविदा फार्म उपजिल्हाधिकारी (रोहयो) कार्यालयात उपलब्ध आहे. दरपत्रक सादर करण्याचा कालावधी दिनांक 08- फेब्रुवारी, 2018 ते 14--- फेब्रुवारी, 2018 ~~दुपारी~~ सायं. 05.00 वाजता पर्यंत राहिल. प्राप्त दरपत्रके ~~दिनांक~~ दिनांक -15- फेब्रुवारी, 2018 ला स. 11.00 वाजता उघडण्यात येईल. या कार्यालयास सादर करावयाच्या दरपत्रकाबाबत विहीत अटी व शर्ती खालील प्रमाणे राहतील.

**अटी व शर्ती**

1. मुद्रणालयधारक अधिकृत परवानाधारक असावा.प्रत्येक मुद्रणालयधारकास फक्त एक दरपत्रक देण्याची परवानगी असेल.
2. यशस्वी दरपत्रक हे नमुद केलेल्या एकुण साहित्याची पुर्तता करणारे सर्वात कमी किमतीचे दरपत्रक असेल.
3. मुद्रणालयधारकाने दरपत्रक सादर करतांना त्यांचा VAT/CST/GST क्रमांक दरपत्रकावर ठळक पणे नोंदवावा. दरपत्रकासोबत मुद्रणालयधारकाचे पॅन कार्डची सांक्षाकीत प्रत जोडणे आवश्यक राहिल.
4. दरपत्रक सादर करणाऱ्या मुद्रणालयधारकाची मागील आर्थिक वर्षातील उलाढाल रू. 5 लक्ष पेक्षा अधिक असावी.
5. मागील दोन वित्तीय वर्षात मुद्रणालयधारकाने शासकीय कार्यालयास मागणीनुसार योग्यरित्या पुरवठा केलेला असावा. सदर कार्यालयास यापुर्वी पुरवठा केलेला असल्यास याबाबत योग्य दस्ताऐवज जोडण्यात यावे.
6. नियोजन पुस्तिका व जॉब कार्ड छपाईचे सर्वसमावेशक दर, दरपत्रकामध्ये नमुद करणे आवश्यक राहील. सदर साहित्य छपाईचे आदेश मिळताच सात दिवसाच्या आत या कार्यालयास पुरवठा करावा लागेल..
7. या कार्यालयास सादर केलेली दरपत्रके निर्धारित दिनांकास व वेळेस उघडतांना मुद्रणालयधारक किंवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहणे अपेक्षित राहिल.

**जिल्हाधिकारी तथा**
**जिल्हा कार्यक्रम समन्वयक (मग्रारोहयो),**
**गडचिरोली**

प्रतिलीपी :- जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी (NIC), गडचिरोली यांनी जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचे संकेतस्थळावर सदर सुचना तात्काळ प्रसिध्द करावी.

**जिल्हाधिकारी तथा**
**जिल्हा कार्यक्रम समन्वयक (मग्रारोहयो),**
**गडचिरोली**